महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : २ डिसेंबर, २०२१.

क्रमांक:१८३१८/क-१ या सचिवालयातील तात्पुरत्या पदोन्नतीमुळे/सेवानिवृत्तीमुळे रिक्त झालेल्या एस-१७-४७६००-१५११०० या वेतनस्तरातील **"कक्ष अधिकारी"** या पदावर सहायक कक्ष अधिकारी संवर्गातील खालील कर्मचाऱ्यांची दिनांक १ जुलै, २०२१ रोजीपासून पुढील आदेश होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली आहे :-

| अ. क्र. | सहायक कक्ष अधिकाऱ्यांचे नाव |
|---|---|
| १. | श्री. जि. अ. गांवकर, सहायक कक्ष अधिकारी |
| २. | श्रीमती अ. दे. पराडकर, सहायक कक्ष अधिकारी |
| ३. | श्री.सु. अ. परब, सहायक कक्ष अधिकारी |
| ४. | श्री.प. प्र. म्हात्रे, सहायक कक्ष अधिकारी |
| ५. | श्री.म. बा. भडेकर, सहायक कक्ष अधिकारी |
| ६. | श्रीमती मि. म. भडेकर, सहायक कक्ष अधिकारी |
| ७. | श्रीमती अ. सि. कदम, सहायक कक्ष अधिकारी |
| ८. | श्रीमती सु. र. लोंढे, सहायक कक्ष अधिकारी |
| ९. | श्री. वि. वि. शिंदे, सहायक कक्ष अधिकारी |

२. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक २७९७/२०१५ मध्ये दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-१६-ब यांच्या शासन निर्णय दिनांक ७ मे, २०२१ मधील तरतूदीनुसार पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दिनांक २५ मे, २००४ च्या स्थितीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून भरण्यात येत आहेत.

..२/-

३. संबंधित कर्मचाऱ्यांना कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नती खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-

(अ) कक्ष अधिकारी संवर्गातील पदोन्नत्या तात्पुरत्या स्वरुपात प्रशासकीय निकड म्हणून देण्यात येत आहेत.

(ब) या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधित कर्मचाऱ्यांना नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

(क) अनुक्रमांक १ ते ४ वरील अनुक्रमे श्री. गांवकर, श्रीमती पराडकर, श्री. परब व श्री. म्हात्रे, आणि अनुक्रमांक ८ व ९ वरील श्रीमती लोंढे व श्री.शिंदे यांना सदरहू पदोन्नत्या कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी घेण्यात येणाऱ्या विभागीय परिक्षा उत्तीर्ण होण्याच्या अधिन राहून देण्यात येत आहेत. कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठीची विभागीय परिक्षा विहित संधीत उत्तीर्ण न झाल्यास, संबंधित कर्मचाऱ्यास सहायक कक्ष अधिकारी या पदावर पदावनत करण्यात येईल.

(ड) कक्ष अधिकारी संवर्गातील सदर पदोन्नती मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ च्या अधीन राहून करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(सुभाष नलावडे)**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति,**

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई-४००००४ यांना महाराष्ट्र शासन राजपत्राच्या पुढील प्रकाशनात भाग-१, अधिसूचना, याखाली प्रकाशित करण्यासाठी अग्रेषित. प्रकाशित अधिसूचनेच्या २० प्रती सचिवालयाकडे कृपया पाठविण्यात याव्यात, ही विनंती.

**प्रतिलिपी :-**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव.

२) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

३) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, महाराष्ट्र शासन, मुंबई.

४) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.

५) सर्व संबंधित सहायक कक्ष अधिकारी.

६) या सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.

७) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

८) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

९) 'क-२' (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

१०) वैयक्तिक नस्ती.

११) निवडनस्ती.